


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २८२ ●सोमवार,दि.१२ जानेवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

## चोर, नेकनूर पोलिसांच्या डोळ्यात धूळ फेकून बाजारातून १५ किलो चांदी चोरून फरार

**नेकनूर । प्रतिनिधी**

ठाणे प्रमुख चंद्रकांत गोसावीं चा कारभार वाखाणण्याजोगा आहे. त्यांनी चक्क नेकनूरसह चौसाळ्याचा आठवडी बाजार चोरांना आंदण दिला असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. सणाच्या ऐन मोक्यावर नेकनूरच्या आठवडी बाजारातून








सराफा व्यापाऱ्याची १५ किलो चांदी असलेली पेटीसह ५० हजार रुपयांची रोकड डल्ला मारून चोर घेऊन गेला. व्यापाऱ्यावर जवळपास ३५ लाख रुपयाची संक्रांत आली. विशेष म्हणजे ही घटना पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर सकाळी दहाच्या सुमारास घडल्याने खळबळ माजली आहे. पोलिसांच्या कृपेने या घटनांमध्ये वाढ झाल्याचा आरोप होऊ लागला आहे. मोबाईल चोरीला गेला, खिसा कापला गेला, महिलांच्या गळ्यातील दागिने गेले तर पोलीस ठाण्यात तक्रारदाराचीच होणाऱ्या उलट तपासणीमूळे नव्या मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते त्यामुळे तक्रारी ही करायला कुणी धजावत नाही तपास व्हायचा तर विषयच येत नाही अशा चोर पोलिसांच्या अडकित्यात जनता मात्र भरडली जात असताना एसपी मात्र कायदा सुव्यवस्थेची घडी बसवल्याचा ढोल कशाच्या जीवावर ▶ उर्वरित पान २ वर

## अंकुश नगर मधील प्लंबर हत्या प्रकरणातील आरोपी अखेर पकडला

बीड - अंकुश नगर भागात प्लंबर हर्षद तुळशीराम शिंदे याच्यावर आधी गोळ्या झाडण्यात आल्या. त्यानंतर हत्या करण्यात आल्याची घटना ६ जानेवारी रोजी घडली होती.दरम्यान या प्रकरणातील फरार आरोपी विशाल सूर्यवंशी च्या मुस्क्या आवळण्यात पोलिसांना यश आले आहे. हर्षद तुळशीराम शिंदे (वय ३८) याचा



आरोपी विशाल सुर्यवंशी याने अंकुश नगर भागामध्ये फुटलेली पाईपलाईन दुरुस्त करत असताना मंगळवार दि. ६ जानेवारी खुन केला होता. हर्षद शिंदेवर सुरूवातीला विशाल सूर्यवंशी याने दोन गोळ्या झाडल्या मात्र त्या गोळ्या हर्षदला न लागल्यामुळे त्याने तिथून पळून जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्याचा ▶ उर्वरित पान २ वर

## रेन्यू पॉवर कंपनीची मनमानी: संमती न घेता वहीती शेतात उभे केले विद्युत पोल



**बीड । प्रतिनिधी**

शेतकऱ्याची संमती न घेता सामूहिक शेती असलेल्या ठिकाणी पवन ऊर्जा निर्मिती करणाऱ्या रेन्यू पॉवर या कंपनीचे बीड तालुक्यातील मोरगाव हद्दीमध्ये कार्यालय असून तेथील संबंधित गुत्तेदाराने मनमानी करत शेतकऱ्यांची पूर्ण परवानगी न घेता वहीत शेतामध्ये विद्युत पूल उभे केले असून ते पोल काढून टाकण्याची मागणी शेतकऱ्याने केली आहे सदर निवेदन संबंधित कंपनी जिल्हाधिकारी पोलीस अधीक्षक, नेकानूर पोलीस स्टेशन तहसीलदार बीड यांना दिले आहे.

बीड तालुक्यातील खंडाळा येथील शेतकरी विलास नरहरी चौरे यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केल्या रिन्यू पावर कंपनी ही सौर ऊर्जा (पवनचक्की) निर्माण करणारी कंपनी असून या कंपनीचे मोरगाव हद्दीमध्ये मांजरसुंबा लिंबागणेश रस्त्यावर कार्यालय असून या कंपनीने विद्युत लाईन ओढण्यासाठी काही कंत्राटदाराची नेमणूक केली आहे ▶ उर्वरित पान २ वर

## लग्नाचे अमिष दाखवून शारिरीक संबंध; एकावर गुन्हा

**आष्टी । प्रतिनिधी**

लग्नाचे आमिष दाखवून तरुणीशी शारिरिक संबंध ठेवत साखरपुडा झाल्यानंतरही लग्नास नकार दिला. या प्रकरणी पोलिस अंमलदाराविरुद्ध अंभोरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. आष्टी तालुक्यातील एका गावातील २४ वर्षीय पीडितेशी मच्छिंद्र हरिभाऊ राठोड याने १ एप्रिल २०२२ ते १ मार्च २०२५ या कालावधीत लग्नाचे आमिष दाखवून वारंवार शारीरिक संबंध ठेवल्याचा आरोप आहे. आरोपी पोलिस भरती झाल्यानंतरही गावी आल्यावर हा प्रकार सुरू होता. प्रकरण उघडकीस आल्यानंतर साखरपुडा झाला, मात्र नंतर त्याने लग्नास नकार दिला. या प्रकरणी पीडितेने अंभोरा पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास अंभोरा पोलिस करीत आहेत.

## रिक्षात विसरलेले पैशांचे पॉकेट केले परत

**बीड । प्रतिनिधी**

आदित्य कॉलेज ते बसस्थानक असा प्रवास करणाऱ्या पुणे येथील प्रवाशाचे रिक्षा मध्ये पॉकेट पडले होते. पॉकेट निदर्शनास येताच रिक्षा चालकाने ते पॉकेट बसस्थानक येथील वाहतूक शाखेच्या चौकीत जमा केले. यानंतर तो प्रवास पोलिसांकडे आला असता खात्री करुन परत केले. प्रवाशांने समाधान व्यक्त केले. या रिक्षाचालकाच्या प्रमाणिकपणाचे कौतुक करण्यात येत आहे. पुणे पिंपरी चिंचवड येथील प्रवासी मनोज नारायण नंबोदरे हे काही कामानिमित्त काल शनिवारी (दि.१०) बीड येथे आले होते. यावेळी त्यांनी तेलगाव नाका ते बसस्थानक असा अशोक गायकवाड यांच्या रिक्षात प्रवास केला. या दरम्यान प्रवासी नंबोदरे यांचे पॉकेट रिक्षात पडले होते. बसस्थानकावर गेले असता ते रिक्षाचे ▶ उर्वरित पान २ वर



बीड येथे राजमाता जिजाऊ यांच्या जन्मोत्सवा निमित्त दिपोत्सवाचा कार्यक्रम उत्साहात संप्पन्न

## पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणूक – मराठवाडा मतदारांचा भव्य मेळावा



**पुणे । प्रतिनिधी**

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील मतदारांचा भव्य मेळावा राज्याचे कार्यक्षम उपमुख्यमंत्री तथा पुणे व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना. अजितदादा पवार साहेब आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) चे प्रदेश सरचिटणीस आ. रोहितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राच्या सर्वांगीण, लोकाभिमुख व गतिमान विकासासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला निवडून देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. या मेळाव्यात मी स्वतः उपस्थित राहून मराठवाड्यातील मतदारांशी ▶ उर्वरित पान २ वर

## जुन्या भांडणाची कुरापत; तरूणास सहा जणांकडून मारहाण

**आष्टी । प्रतिनिधी**

जुन्या भांडणाची कुरापत काढून एका २० वर्षीय तरूणास पाच ते सहा जणांनी मारहाण करून जखमी केल्याची घटना आष्टी तालुक्यातील आंधळे वस्ती, केरूळ येथे घडली. या प्रकरणी सहा जणांविरोधात आष्टी ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. प्रदिप अंकुश आंधळे या तरूणाला आरोपी सतिष भाऊसाहेब आंधळे, कृष्णा आंधळे, तुकाराम सांगळे, पोपट सांगळे, इश्वर सांगळे, आशाबाई सांगळे या सहा जणांनी मारहाण केली. सदरील ही मारहाण जुन्या भांडणाची कुरापत काढून करण्यात आली. या मध्ये प्रदिप आंधळे हा तरूण जखमी झाला असून या प्रकरणी आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत आहेत.

## मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे येणाऱ्यासाठी 12 जानेवारीला टोलमाफी द्या

### खा.बजरंग सोनवणे यांची केंद्र व राज्याकडे मागणी

**बीड । प्रतिनिधी**




राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त दि. १२ जानेवारी २०२६ रोजी मातृतीर्थ सिंदखेडराजा (ता. सिंदखेडराजा) येथे होणाऱ्या भव्य कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर त्या दिवशी येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व वाहनांना टोलमाफी देण्यात यावी, अशी मागणी बीड लोकसभा मतदारसंघाचे खा. बजरंग सोनवणे यांनी केली आहे. यासंदर्भात खासदार सोनवणे यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे (MSRDC) व्यवस्थापकीय संचालक यांना सविस्तर पत्र पाठवून तातडीने आदेश काढण्याची विनंती केली आहे. पत्रात नमूद केल्याप्रमाणे, राजमाता जिजाऊ जयंती अत्यंत श्रद्धा व उत्साहात साजरा केली जाते. या पावन प्रसंगी बीडसह मराठवाडा व राज्याच्या विविध भागांतून लाखो नागरिक, महिला मंडळे, युवक तसेच विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सिंदखेडराजा येथे दाखल होतात. त्यामुळे त्या दिवशी महामार्गांवर प्रचंड वाहतूक वाढते. या पार्श्वभूमीवर कार्यक्रमासाठी येणाऱ्या भाविकांना कोणत्याही प्रकारचा वाहतुकीचा अडथळा निर्माण होऊ नये, तसेच वाहतूक सुरळीत व सुरक्षित राहावी, यासाठी १२ जानेवारी २०२६ रोजी मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व खासगी वाहने, एसटी बसेस, चारचाकी व इतर वाहनांना टोलमाफी देण्यात यावी, अशी स्पष्ट मागणी करण्यात आली आहे. टोलमाफीमुळे नागरिकांना आर्थिक दिलासा मिळेल, टोलनाक्यांवरील गर्दी कमी होईल आणि वाहतूक व्यवस्थापन अधिक सुलभ होईल, असेही खासदार सोनवणे यांनी पत्रात नमूद केले आहे. त्यामुळे या संदर्भात तातडीने आवश्यक आदेश निर्गमित करावेत, अशी विनंती त्यांनी संबंधित यंत्रणांकडे केली आहे.









# 12 जानेवारी — राजमाता जिजाऊ जयंती : बहुजन समाजाची माता , स्वराज्यसंस्कारांची जननी आणि महाराष्ट्राच्या मातृत्वाची सर्वोच्च उंची

महाराष्ट्राच्या इतिहासात काही व्यक्ती अशा आहेत , ज्यांचे कार्य केवळ त्यांच्या आयुष्यापुरते मर्यादित राहत नाही ; ते कार्य पिढ्यान्पिढ्या समाजाच्या रक्तात मिसळते . राजमाता जिजाऊ या अशाच महान व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत . १२ जानेवारी हा दिवस केवळ एका मातृजन्माची आठवण करून देत नाही ; तो महाराष्ट्राच्या सामाजिक , सांस्कृतिक आणि वैचारिक जडणघडणीचा पाया आठवण करून देतो . जिजाऊ म्हणजे केवळ छत्रपती शिवाजी महाराजांची माता नव्हे ; त्या बहुजन समाजाच्या आशेचे प्रतीक , गोरगरीब जनतेच्या वेदनांची जाण असलेली माता आणि स्वराज्यसंस्कारांची आद्य शिक्षिका होत्या . राजमाता जिजाऊंचा जन्म अशा काळात झाला , जेव्हा समाज अनेक स्तरांत विभागलेला होता . जातीभेद , धर्मभेद , अन्याय , अत्याचार आणि परकीय सत्तांचे दडपण सर्वसामान्य माणसाच्या जीवनावर खोल परिणाम करत होते . गोरगरीब शेतकरी , कष्टकरी , स्त्रिया , बहुजन समाज – हे सगळेच अन्यायाच्या ओझ्याखाली दबलेले होते . अशा काळात जिजाऊंचे मातृत्व केवळ घरापुरते मर्यादित राहिले नाही ; ते समाजाकडे वळले .



जिजाऊंच्या जीवनाचा मोठा विशेष म्हणजे त्यांनी बहुजन समाजाकडे केवळ सहानुभूतीने पाहिले नाही , तर कर्तव्यभावनेने पाहिले . त्यांच्या दृष्टीने राजा , प्रजा , जाती , धर्म यामध्ये भेद नव्हता ; त्यांच्यासाठी माणूस महत्त्वाचा होता . स्वराज्याची कल्पना त्यांच्या मनात निर्माण झाली , ती केवळ सत्ता मिळवण्यासाठी नव्हे , तर अन्यायग्रस्त समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी . गोरगरीब , सर्वसामान्य माणूस हा जिजाऊंच्या विचारांचा केंद्रबिंदू होता . शेतकरी , कष्टकरी , सैनिक , महिला , लहान मुले – या सगळ्यांच्या वेदना त्यांनी जवळून पाहिल्या होत्या . परकीय सत्तांच्या जुलूमाखाली रयतेचे जीवन किती हलाखीचे आहे , हे त्यांना ठाऊक होते . म्हणूनच त्यांनी बाल शिवाजीच्या मनात रयतेचा राजा ही संकल्पना रोवली . ही संकल्पना त्या काळात क्रांतिकारक होती . जिजाऊंनी शिवाजीला सांगितलेली प्रत्येक गोष्ट ही समाजाभिमुख होती . त्यांनी सांगितलेल्या रामायण , महाभारत , पुराणकथा या केवळ धार्मिक नव्हत्या ; त्या सामाजिक होत्या . त्या कथांतून त्यांनी अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची शिकवण दिली , दुर्बलांचे संरक्षण करण्याची प्रेरणा दिली आणि धर्म म्हणजे माणुसकी हे स्पष्ट केले .

जिजाऊंनी विविध जाती , धर्म आणि समाजघटक यांना एकत्र आणण्याचे प्रयत्न केले . त्यांच्या दृष्टीने स्वराज्य हे एखाद्या जातीचे किंवा धर्माचे नव्हते ; ते सर्वांचे होते . मराठा , धनगर , माळी , कुणबी , कोळी , आदिवासी , मुसलमान , सर्वसामान्य शेतकरी – हे सगळे स्वराज्याचे घटक आहेत , ही भावना त्यांनी शिवाजीच्या मनात रुजवली . म्हणूनच पुढे शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात सर्व समाजघटकांना स्थान मिळाले .

जिजाऊंच्या संस्कारांमुळेच शिवाजी महाराजांनी मुस्लिम सरदारांना सन्मानाने वागवले , स्त्रियांचा अपमान करणाऱ्यांना कठोर शिक्षा दिली आणि धर्माच्या नावाखाली अन्याय होऊ दिला नाही . ही मूल्यदृष्टी एका मातेकडून आलेली होती .

राजमाता जिजाऊ या बहुजन समाजाच्या माता का ठरतात , याचे उत्तर त्यांच्या विचारांत आहे . त्यांनी समाजातील दुर्बल घटकांना ताकद देण्याचा विचार केला . त्यांनी सत्ता म्हणजे सेवा आहे , हा विचार रुजवला . त्यामुळेच स्वराज्य ही केवळ राजकीय सत्ता राहिली नाही ; ती सामाजिक चळवळ बनली .

आज महाराष्ट्रातील प्रत्येक मातेने राजमाता जिजाऊंचा आदर्श का घ्यावा , याचे उत्तर फार साधे आहे . जिजाऊंनी दाखवून दिले की आई केवळ जन्म देत नाही ; ती संस्कार देते . आईच्या शब्दांतून , तिच्या कृतीतून आणि तिच्या मूल्यांतून मुलाचे व्यक्तिमत्त्व घडते . आजच्या काळात , जिथे स्पर्धा , भौतिक सुख आणि धावपळ वाढली आहे , तिथे जिजाऊंचे मातृत्व अधिक महत्त्वाचे ठरते .प्रत्येक मातेने आपल्या मुलाला केवळ यशस्वी बनवण्याचा विचार न करता संवेदनशील , न्यायप्रिय आणि समाजाभिमुख बनवण्याचा विचार केला पाहिजे . जिजाऊंनी शिवाजीला तलवार देण्यापूर्वी मूल्यांची धार दिली . म्हणूनच त्यांचे शौर्य लोककल्याणकारी ठरले .

प्रत्येक मुलानेही राजमाता जिजाऊंचा आदर्श का घ्यावा , याचे उत्तर त्यांच्या आयुष्यात आहे . जिजाऊंचा आदर करणे म्हणजे केवळ इतिहासाचा सन्मान करणे नाही ; ते मातृत्वाचा सन्मान करणे आहे . त्यांनी शिकवले की आईचा आदर , समाजाचा आदर आणि देशाचा आदर हे वेगळे नसतात ; ते एकमेकांशी जोडलेले असतात . १२ जानेवारी रोजी राजमाता जिजाऊ यांचा जन्मदिन साजरा करण्यामागचा उद्देशही हाच आहे . हा दिवस केवळ उत्सवासाठी नाही ; तो चिंतनासाठी आहे . आपण आपल्या घरात , समाजात आणि देशात कोणते संस्कार रुजवत आहोत , हा प्रश्न विचारण्यासाठी हा दिवस आहे .

जिजाऊ जयंती साजरी करण्याचा खरा अर्थ म्हणजे त्यांच्या विचारांची उजळणी करणे . मातृत्वाला सामाजिक जबाबदारीची जोड देणे . मुलांच्या मनात स्वाभिमान , कर्तव्य आणि माणुसकी रुजवणे . बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी काम करणे .

राजमाता जिजाऊंचे आयुष्य आपल्याला शिकवते की मोठे बदल राजवाड्यांतून नाही , तर घरांतून सुरू होतात . आईच्या मांडीवर बसून ऐकलेल्या कथा पुढे इतिहास घडवतात . म्हणूनच जिजाऊ म्हणजे इतिहासातील एक पात्र नाही ; त्या आजही प्रत्येक संस्कारात जिवंत आहेत . १२ जानेवारी हा दिवस महाराष्ट्राला सांगतो – जर स्वराज्य टिकवायचे असेल , तर जिजाऊंचे संस्कार जपावे लागतील . जर समाज सशक्त करायचा असेल , तर मातृत्वाला मूल्यांची दिशा द्यावी लागेल . आणि जर भविष्य उजळ करायचे असेल , तर बहुजन समाजाला केंद्रस्थानी ठेवावे लागेल .

राजमाता जिजाऊ म्हणजे मातृत्वाची सर्वोच्च उंची . त्या केवळ एका राजाच्या माता नव्हत्या ; त्या एका राष्ट्रविचाराच्या जननी होत्या . त्यांच्या चरणी नतमस्तक होऊन एवढेच म्हणावेसे वाटते – आई तू इतिहास घडवला नाहीस , आई तू इतिहासाला दिशा दिलीस . राजमाता जिजाऊंना कोटी कोटी नमन .

**– चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार, बीड**

◆ पान १ वरून पुढे...

## चोर, नेकनूर...

वाजवत आहेत. असा प्रश्न विचारला जात आहे.
नेकनूर चा आठवडी बाजार जनावरांच्या खरेदी विक्रीसाठी प्रसिद्ध आहे. पण सध्या तो चोरांचा बाजार बनलं असल्याचं पाहायला मिळत आहे. मोबाईल चोर, खिसे कापू यांना सुगीचे दिवस आले आहेत. जी स्थिती नेकनुर ची तीच चौसाळा बाजार ची. विशेष म्हणजे अशा तक्रारी घेऊन कागदं काळे करायला पोलिसांना वेळ नाही. एखादी मोठी घटना चोरीची अथवा अन्य गुन्ह्यांची घडलीच तर नेकनूर पोलीस ठाण्याला तक्रार द्यायची. पुन्हा दखल घेतली नाही म्हणून पोलीस अधीक्षक कार्यालयाचे उंबरे झिजवावे लागत आहेत. धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर सयाजी शिंदेंचा डाळिंबाचा बाग चोरीला गेला. त्याकरता तक्रारदाराला एसपींची भेट घ्यावी लागली. एस पीं नी गुन्हे दाखल करा असे आदेश देण्या ऐवजी विनंतीच्या सुरात चंद्रकांत गोसावींना घ्या तक्रार असं सांगितलं. त्यानंतरही तक्रारीची दखल घेतली नव्हती. माध्यमांनी बोंब ठोकली त्यावेळी कसातरी गुन्हा नोंद केला. तीच स्थिती जोगवा मागून खाणाऱ्या घारगावच्या अंजना बन यांची झाली. देवळात झोपायचं नाही म्हणून एकाने मारहाण केली नाकातली मोरणी चोरली.आजींनी रीतसर तक्रार दिली. एसपींना आत्मदहनाचा इशारा दिला. तरीही दखल घेतली गेली नाही. शेवटी या प्रकरणात देखील माध्यमांना ओरड करण्याची वेळ आली. ओरड होताच तात्काळ कारवाई झाली. आजीला न्याय मिळाला. नेकनूर बस स्थानक, बँक, शिक्षक कॉलनीत चोरीच्या अनेक घटना घडल्या. या प्रकरणांमध्ये देखील काहीच झालं नाही. अनेक शेतकऱ्यांचा दारात ठेवलेला सोयाबीन सारखा माल चोरांनी रात्रीच भरून नेला. त्यातही तक्रार देऊनही पुढे काहीच झालं नाही.

◆ पान १ वरून पुढे...

पोलिसांना चोर सापडलेच नाही. सापडतील कसे तपास झालाच नाही. ठाणे प्रमुख चंद्रकांत गोसावींना तो करावासा वाटला नाही. आपण तर एसपी चे लाडके म्हणून खाकी वर्दीची इज्जत त्यांनी ठेवली नाही. पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी तक्रारदाराने ठाण्याला येण्याची गरज नाही. क्यू आर कोड स्कॅन करा तक्रार दाखल करा असा आधुनिकतेचा मंत्र जनतेला दिला. याचाही ढोल नगारा माध्यमांनी जोरात वाजवला. पण जिथे प्रत्यक्षात तक्रार देऊन काही होत नाही. तिथे क्यू आर कोड ची दखल कोण घेणार? असा प्रश्न जनतेला का पडू नये अशी स्थिती सध्याची तरी आहे.
नेकनूर पोलीस आठवडी बाजारात येणाऱ्या वाहनांना अडवून निधी संकलन करतात. चौसाळ्यात तर खास नेकनूर मधून माणूस रिक्षावाल्यांकडून वसुली करण्यासाठी पाठवला जातो.बाजारात चोर चुपचाप खिसे कापून, महिलांचे दागिने लंपास करून, मोबाईल चोरून पोलिसांच्या नाकावर टिच्चून निघून जातात. वसुली पुढे पोलिसांना होणाऱ्या चोऱ्यांशी काहीच देणे घेणे नाही. तक्रार घेऊन एखादा ठाण्यात आलाच तर दाप दडप करून कसा पिटाळून लावायचा त्याचीच उलट तपासणी कशी घ्यायची यामध्ये नेकनूर पोलिसांचा हात कोणीच धरू शकणार नाही अशी स्थिती आहे. आज नेकनूरच्या आठवडी बाजारात पोलीस ठाण्याच्या अगदी हाकेच्या अंतरावर बबन पांडुरंग कानडे नावाच्या सराफा व्यापाऱ्याची ३५ लाख रुपये किमतीची १५ किलो चांदी असलेली पेटी चोरांनी पळवली. नुसती पेटीच पळवली नाही तर ५० हजार रुपयांची रोकड देखील लंपास केली. संक्रांतीचा बाजार असल्यामुळे व्यापाऱ्यावर देखील सकाळी दहाच्या सुमारास चोरांची संक्रांत आली. चोरांचा दुपारपर्यंत शोध सुरू होता. या प्रकरणात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. या प्रकरणात तरी पोलीस अधीक्षक सराफा व्यापाऱ्याला न्याय देऊ शकतील का? चंद्रकांत

◆ पान १ वरून पुढे...

गोसावींच्या कारभाराला आळा घालू शकतील का? गोसावी लाडके आहेत म्हणून पुन्हा त्यांना पाठीशी घातलं जाणार का? यासारखे अनेक प्रश्न विचारले जात आहेत.

## अंकुश नगर....

पाठलाग करून विशालने हर्षदची हत्या केली. अंकुशनगर भागात घडलेल्या या घटनेमुळे खळबळ उडाली होती. मंगळवारी घटना घडल्यापासून आरोपीच्या तपासासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे दोन व शिवाजी नगर पोलिसांचे एक पथक मागावर होते. अखेर रविवारी सायंकाळच्या सुमारास कळंबवरून केजकडे येत असताना दुचाकीसह आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेचे व शिवाजी नगर पोलिसांच्या टीमने ताब्यात घेतले आहे. हर्षद शिंदे याची हत्या विशाल सूर्यवंशी ने का केली याचे कारण उघडकीस येणार आहे

## रेन्यू पॉवर.....

प्रामुख्याने ज्यांच्या वहीती असलेल्या शेतामधून किंवा मालकी हक्कातून पोल किंवा लाईन ओढली जाणार आहे त्यापूर्वी संबंधित शेतकऱ्याची परवानगी घेणे बंधनकारक असताना या कंपनीने मनमानी करत गुत्तेदाराकरवी नियमबाह्यरित्या विद्युत पोल उभे केले आहेत विशेषतः हे पोल उभे करताना ज्या गटातून शेतातून विद्युत लाईन किंवा पॉल उभे केले जाणार आहेत त्या शेतकऱ्यांची संमती घेणे गरजेचे असताना ती घेतली गेली नाही सामूहिक शेती असेल तर सर्वांची संमती घेणे गरजेचे असताना ती घेतली गेली नाही विशेष म्हणजे यापूर्वीच गाव तलावासाठी आमची जमीन शासनाने संपादित केली आहे आणि आमच्या कुटुंबाची उपजीविका आता त्याच वहिती जमिनीवर असल्याने त्याच वहिती जमिनीवर मनमानी पद्धतीने

◆ पान १ वरून पुढे...

रेन्यू पॉवर कंपनीने व त्यांच्या गुत्तेदाराने विद्युत पूल उभे केल्यामुळे मोठे नुकसान झाले आहे भविष्यातही ही जमीन नापीक होऊ शकते तेव्हा माझ्या जमिनीमध्ये उभे केलेले रेन्यू कंपनीने विद्युत पोल त्वरित काढण्यात यावेत अशी मागणी जिल्हाधिकारी पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनात केली आहे संबंधित कंपनीला निवेदन देण्यासाठी गेली चार दिवस चकरा मारल्या मात्र तेथे कोणीही अधिकारी आढळून आला नाही म्हणून जिल्हा प्रशासनाला निवेदन देण्यात आले

## रिक्षात विसरलेले....

भाडे देऊन तसेच निघून गेले. ते गेल्यानंतर रिक्षा चालक गायकवाड यांची नजर त्या पॉकेटवर गेली. त्यांनी पॉकेट घेऊन प्रवशाचा शोध घेतला पण ते मिळून आला नाही. यानंतर रिक्षा चालकाने तो पॉकेट बसस्थानकाच्या वाहतूक शाखा पोलीस चौकीत जमा केले. काही वेळाने सदरील प्रवाशी रिक्षा शोधत पोलीस चौकी जवळ आला यानंतर खात्री करुन तो पॉकेट परत केले. यावेळी पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, हवालदार राजाभाऊ तांदळे, अंमलदार वसीम शेख, सुग्रीव शिंदे, अकबर पटेल आदी उपस्थित होते.

## पुणे व....

थेट संवाद साधत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला भक्कम पाठिंबा देण्याचे आवाहन केले. मराठवाड्यातील मतदारांचा मोठ्या संख्येने लाभलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा परिवर्तनाचा स्पष्ट संदेश देणारा आहे. यावेळी आमदार संदीप भैय्या क्षीरसागर यांच्यासह स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

◆ पान ४ वरून पुढे...

## नगराध्यक्षाचे पदग्रहण ....

अभियान २.० स्वच्छता मोहीम गेवराई शहरांमध्ये नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. गीताभाभी बाळराजे पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत नगरपरिषद कडून राबवण्यात आली यावेळी सर्व नगरसेवक व न.प. कर्मचारी वर्ग उपस्थित होते

## अखेर चिमुकल्यांच्या....

राहुल भदे व ग्रामविकास अधिकारी प्रतापसिंह नाईक यांनी प्रत्यक्ष शाळेला भेट देत पंचनामा केला.शाळेकडे जाण्यासाठी तीन मार्ग खुले करण्यात आले असून आता वर्ग पुन्हा शाळेच्या इमारतीत सुरू करण्यात आले आहेत.
यासंदर्भात गटविकास अधिकारी ज्योत्स्ना मुळीक यांनी सांगितले की, वरिष्ठांच्या आदेशानुसार रस्ता खुला करण्यात आला आहे. भविष्यात शाळेच्या मार्गात कोणीही अडथळा निर्माण केल्यास नियमानुसार संबंधितांविरोधात पोलिसांत गुन्हा दाखल केला जाईल.
दत्तनगर वस्तीशाळेसाठी २००७–०८ मध्ये शाळा इमारत बांधण्यात आली होती; मात्र अतिक्रमणामुळे शाळेकडे जाणारा मार्ग बंद झाला होता. कडाक्याच्या थंडीत विद्यार्थ्यांना उघड्यावर शिक्षण घ्यावे लागत असल्याने पालक व शिक्षणप्रेमींमध्ये तीव्र संताप व्यक्त होत होता. अखेर सामाजिक कार्यकर्त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून चिमुकल्यांचा 'वनवास' संपला आहे. चिमुकल्यांचा आवाज शासनदरबारी बुलंद करणाऱ्या प्रसारमाध्यमांचे पालक, विद्यार्थी व शिक्षणप्रेमींच्या वतीने डॉ.

◆ पान ४ वरून पुढे...

गणेश ढवळे यांनी मनःपूर्वक आभार मानले आहेत.

## तलवाडा येथील....

सतत भेटून ही विनंती करून देखील ही २०२३/२४ चे रमाई घरकुल केले नाहीत तरीही आम्ही साहेबांना सतत भेटत राहिलोत परंतु आमच्या कडून त्यांना त्यांच्या अपेक्षा नुसार त्यांना त्यांनी सांगितले ल्या लाभधारका कडून आर्थिक लाभ न भेटल्या मुले रमाई घरकुल सर्व लाभधारक उडविण्यात आले परंतु आज रोजी सन. २०२४/२५ पुन्हा तलवाडा या गावी (३९) रमाई घरकुल मंजूर झालेले आहेत तरीही (३९) लाभार्थ्या पैकी काही लाभ धारकांना पंचायत समितीशी कुठलं ही देणे घेने नसतांना अस्या लाभार्थ्यांना हक्काच्या लाभा पासून वंचित ठेवले म्हणून आम्ही बीडीओ साहेबांची वारंवार भेट घेऊन सुद्धा त्यांनी पण कुठली ही अद्याप दखल न घेतल्या मुळे रमाई घरकुल लाभधारक यांना न्याय आपल्या कडून भेटेल अशी आम्ही अपेक्षा करतोत थोरात साहेब व बीडीओ साहेब यांच्या कडून काभधारकांची जाणून बुजून हेळसांड करण्यात आली म्हणून आम्ही व लाभार्थ्यांच्या वतीने दि.१४ जानेवारी २०२६ पर्यंत राहिलेल्या लाभधारकाचे रजिस्ट्रेशन व हप्ते न पडल्यास दि.१५/०१/२०२६ रोजी लोकशाही मार्गाने उपोषण करण्यात येईल जर या उपोषणा दरम्यान लाभधारक आणि आमचे काही बर वाईट झालं तर याला सर्वस्वी जबाबदार थोरात साहेब व बीडीओ साहेब हे राहतील याची नोंद घ्यावी उपोषण ठिकाण पंचायत समिती कार्यालय गेवराई हे राहील आसे निवेदनाच्या शेवटी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे विनोद आठवले यांनी म्हटले आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## रोटरी क्लबतर्फे.....

क्लब ऑफ गेवराई यांच्या वतीने तालुक्यातील पाच महिलांना आदिशक्ती सन्मान पुरस्कार देण्यात येणार आहे . या पुरस्काराचे स्वरूप महावस्त्र ,शाल, सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ असे आहे. रोटरी क्लबचे वरिष्ठ मान्यवरांच्या हस्ते या आदिशक्तींना सन्मानित केले जाणार आहे . हा रंगारंग सन्मान सोहळा बीड रोडवरील हॉटेल निसर्गमध्ये सायंकाळी सात वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न केला जाणार आहे . १९ जानेवारी ही संभाव्य तारीख ठरविण्यात आली आहे . उपस्थितांना मार्गदर्शन करण्यासाठी रोटरी इंटरनॅशनल ३१३२ चे प्रांतपाल सुधीर लातुरे,भावी प्रांतपाल जयेश पटेल यांच्या पत्नी सौ.पारूल पटेल ,रोटरी क्लब सोलापूरच्या अध्यक्षा धनश्री केळकर , रोटरी क्लब अंबाजोगाईच्या अध्यक्षा प्रा . डॉ . रोहिणी पाठक आदींची उपस्थिती राहणार आहे पुरस्कारार्थींच्या निवडीसाठी एका समितीचे गठण करण्यात आले आहे . लवकरच आदिशक्ती सन्मान पुरस्कारासाठी निवडलेल्या कर्तृत्ववान महिलांची नावे जाहीर केली जातील . या उपक्रमासाठी प्रोजेक्ट चेअरमन म्हणून धर्मराज करपे काम पाहत आहेत . कार्यक्रम यशस्वीतेसाठी रोटरी क्लबचे सचिव प्रवीण जैन ,उपाध्यक्ष सुदाम धुपे, कोषाध्यक्ष सुरेश बर्गे , सहसचिव डॉ. नागनाथ मोटे , व्होकेशनल सर्व्हिस चेअरमन राजेंद्र डेंगे, क्लब डमिनिस्ट्रेशन चेअरमन गणेश कुलकर्णी आदी परिश्रम घेत आहेत .

## चव्हाणवाडी तहत...

◆ पान ४ वरून पुढे...

काशीनाथ महाराज गणेश गड नागतळा आष्टी, दिं ६/१/२०२६ रोजी ह.भ.प.महंत हनुमान महाराज घोलप तलवाडा, दिं ७/१/२०२६ रोजी कैलास महाराज आनंदे वा. शी. संस्थान आळंदी देवाची, दिं ८/१/२०२६ रोजी दिपक महाराज बुरुंडे श्री साई संस्थान तलवाडा, दिं ९/१/२०२६ रोजी आदिनाथ महाराज शास्त्री तारकेश्वर गढ, दिं १०/१/२०२६ रोजी रामहरी महाराज वायभसे भगवान गड, दिं पौ व. ८ ११/१/२०२६ रोजी काल्याचे किर्तन ह.भ.प.महंत अशोक महाराज श्री शेत्र पंचवटी संस्थान लुखामसला यांचे सकाळी १० ते १२ या वेळेत काल्याचे किर्तन तदनंतर महाप्रसादाचे आयोजन वाटप होऊन कार्यक्रमाची ऊत्साहत सांगता संपन्न झाली. या वेळी चव्हाणवडी, श्रीकृष्ण नगर, विठ्ठल नगर पंचक्रोशीतील भाविकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिति होती.

## बुरंडवाडीत मंगळवारी...

विडा) यांच्या सुश्राव्य कीर्तनाने होणार आहे. विडेकर महाराजांचे कीर्तन ऐकण्यासाठी वारकरी सांप्रदायातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. कीर्तन सोहळ्यानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.कै.पंडित भोसले यांनी डॉ. विश्वनाथराव कराड विद्यालयात सहशिक्षक म्हणून प्रदीर्घ काळ सेवा बजावली होती.त्यांच्या निधनानंतर त्यांच्या कार्याची आठवण म्हणून भोसले परिवाराने हा धार्मिक उपक्रम राबवला आहे.या कीर्तन सोहळ्यास आणि महाप्रसादास जास्तीत जास्त भाविकांनी उपस्थित राहावे असे आवाहन भोसले परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.*

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे ७५ व्या अमृत महोत्सवी धर्मनाथ बीज सप्ताहाचे १३ जानेवारी रोजी भव्य आयोजन

## सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे : गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज



**बीड । प्रतिनिधी**

विसाव्या शतकातील महान संत वै सद्गुरू किसान बाबा महाराज यांच्या हस्ते सुरू करण्यात आलेल्या धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताहचे ७५ वे अमृत महोत्सवी वर्ष असून ह भ प गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे दि.१३ जानेवारी मंगळवारी रोजी अखंड हरिनाम सप्ताह आरंभ होणार आहे. दि.१३ जानेवारी मंगळवारी रोजी दुपारी १२ वाजता ह भ प गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांच्या हस्ते विधिवत पूजा करून, संत महंत व भाविक भक्तांच्या उपस्थितीत फुले टाकून धर्मनाथा बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात आरंभ होईल. अखंड हरिनाम सप्ताह मध्ये दररोज काकडा आरती, विष्णू सहस्रनाम,ज्ञानेश्वरी पारायण सोहळा गाथा भजन हरिपाठ प्रवचन सेवा,भावार्थरामायण संख्याकाळी ८:०० ते ११:०० हरी किर्तन, संगीत भजन, सार्वजनिक जागर असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. हरी किर्तन सेवा- १३ जानेवारी मंगळवारी संजय नाना धोंडगे नाशिक

१४ जानेवारी बुधवार कविराज झावरे अहिल्यानगर

१५ जानेवारी गुरुवारी संतोष आढावणे बुलढाणा

१६ जानेवारी शुक्रवारी योगीराज महाराज गोसावी पैठण

१७ जानेवारी शनिवारी कृष्णा महाराज चौरे पंढरपूर

१८ जानेवारी रविवारी श्रावण महाराज जगताप विसापूर

१९ जानेवारी सोमवार चंद्रकांत महाराज खळेकर राहुरी .२० जानेवारी मंगळवार दुपारी ह भ प अक्रूर महाराज साखरे गेवराई यांचे १२ ते ०२ या वेळेत काल्याचे कीर्तन होईल, महा प्रसाद होईल

२० संध्याकाळी ८:०० ते ११ वाजता ह भ प रामायणाचार्य पदमाकर महाराज देशमुख अमरावती यांचे कीर्तन. श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथील धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह मध्ये जास्तीत जास्त भाविक भक्तांनी उपस्थित रहावे असे आवाहन श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी महंत ह भ प गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांनी केले आहे


व्यवस्था व नियोजन- - किर्तना करीता १ एककर भव्य डोम - २ एककर रिकाम्या जागेत अतिरिक्त बसण्याची सोय . - ५ एककर मोठ्या गाड्यांची पार्किंग व २ एककर टू व्हिलर साठी व्यवस्था . - पिंपळनेर पोलिस ठाणे ए. पी आय घुगे व कर्मचारी यांचा चोख बंदोबस्त

### ● गर्भगिरी प्रदक्षिणा ; नवनाथ बाबा यांची पालखी सोहळा....

**१४ जानेवारी बुधवार रोजी सकाळी साडेआठ वाजता गर्भगिरी प्रदक्षिणा महंत गुरुवर्य शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांची भव्य पालखी सोहळा निघणार आहे टाळ मृदुंग ढोल ताशा च्या गजरामध्ये भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आलेले आहे तरी भाविक भक्तांनी उपस्थित राहावे'**

### ● किसान बाबानी सुरू केलेली भाकरीची परंपरा.....

**गुरुवर्य सद्गुरू वै. किसान बाबा महाराज यांच्या हस्ते ७५ वर्षा पूर्वी पासून गोरक्षनाथ टेकडी परिसरातील ८०ते ९० गावातील भाविक भक्तां भाकरीची पंगत नित्यनेमाने दररोज घेऊन येतात.**



# आष्टी येथील फार्मसी कॉलेजमध्ये स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमाला उत्साहात संपन्न

**आष्टी । प्रतिनिधी**



आनंद चॅरिटेबल संस्था संचलित कॉलेज ऑफ फार्मास्युटिकल सायन्स अँड रिसर्च, आष्टी (डी. फार्मसी, बी. फार्मसी, एम. फार्मसी) येथे दिनांक १० जानेवारी २०२६ रोजी स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमाला उत्साहात पार पडली. ही व्याख्यानमाला विद्यार्थी विकास विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आणि आनंद चॅरिटेबल संस्था संचलित कॉलेज ऑफ फार्मास्युटिकल सायन्स अँड रिसर्च, आष्टी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहायक प्राध्यापक अनिल धायगुडे यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या वैचारिक वारशाचे महत्त्व विशद करत भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे योगदान अधोरेखित केले.

या प्रेरणादायी व्याख्यानमालेचे उद्घाटन डॉ. योगितातार्ई होके पाटील (व्यवस्थापन परिषद सदस्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर) यांच्या हस्ते झाले. उद्घाटनपर भाषणात त्यांनी संविधान, लोकशाही व राष्ट्रसुरक्षा यांचा परस्पर संबंध स्पष्ट करत विद्यार्थ्यांनी वैचारिकदृष्ट्या सजग राहणे, सामाजिक जबाबदारी स्वीकारणे आणि राष्ट्रहिताची जाणीव ठेवणे आजच्या काळात अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. काशिनाथजी देवधर (DRDO, भारत सरकारचे माजी Group Director) यांनी ऑपरेशन सिंदूर आणि आत्मनिर्भर भारत या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण व अनुभवसंपन्न व्याख्यान दिले. स्वदेशी संरक्षण तंत्रज्ञानाची ताकद, सैनिकांच्या सुरक्षिततेमागील विज्ञान, कारगिल युद्धकाळातील अनुभव तसेच आत्मनिर्भर भारताची वाटचाल त्यांनी सोप्या व प्रभावी शब्दांत उलगडून सांगितली. कारगिल युद्धाच्या काळात स्व. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्यासोबत कार्य करतानाचे अनुभव त्यांनी कथन केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक आत्मविश्वास व राष्ट्राभिमान अधिक दृढ झाला.

प्रमुख पाहुणे डॉ. अशोक कोरडे पाटील यांनी विद्यापीठे ही केवळ पदव्या देणारी केंद्रे नसून राष्ट्रघडणीची प्रयोगशाळा असल्याचे मत व्यक्त केले.

# के.एस.पी. विद्यालय येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरा



**बीड । प्रतिनिधी**

के.एस.पी. विद्यालय, बीड येथे दर वर्षा प्रमाणे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहत साजरे करण्यात आले. या कार्यक्रमास इयत्ता १ ली ते ९ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. शाळेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी, सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यासाठी आयोजित केलेला वार्षिक उत्सव, जो विद्यार्थ्यांसाठी एक अविस्मरणीय अनुभव असतो आणि समाजालाही जोडतो. या कार्यक्रमांमध्ये गाणी, नृत्य, एकांकिका आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देऊन विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना प्रोत्साहन मिळाले. त्यामुळे विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि समाज यांच्यात संबंध दृढ होण्यास मदत झाली.

सर्व विद्यार्थ्यांनी कला गुण साजरीकरणातुन उपस्थिताचे मने जिंकले. उपस्थितीत मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जगदीश शिंदे, भाऊसाहेब वाघमारे, दिनेश दोडके यांनी केले. या कार्यक्रमाची पूर्व तयारी सर्व शिक्षकवृध्दांनी करुन घेतली होती. त्या प्रमाणे सर्व कार्यक्रम अत्यंत उत्साहात साजरा झाला. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती ए पी आय डंबाळे साहेब, पोलिस निरीक्षक, भाकरे साहेब, शिवाजी नगर पोलिस स्टेशन, बीड , प्रा. जे.पी. शेळके,एमॅच्युअर खो-खो असोसिएशन बीडचे अध्यक्ष, श्री. ऋषिकेशजी शेळके, (जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख) , सौ.अंजलीताई शेळके,

# फातिमा शेख यांचे कार्य स्त्रीशिक्षण, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्यायाचे प्रतीक आहे : नगरसेवक शेख राईस

**बीड । प्रतिनिधी**



त्या काळात दलित,वंचित, मुस्लिम समाजातील स्त्रियांना शिक्षणाची द्वारे उघडी नव्हती. महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्यासोबत खांद्याला खांदा लावून फातिमा शेख यांनी शिक्षणाची धुरा पुढे नेली. सामाजिक बहिष्कार, अपमान आणि धमक्यांना तोंड देत त्यांनी सुरू केलेले शिक्षणाचे कार्य कायम ठेवले. यामुळेच खऱ्या अर्थाने स्त्रीशिक्षण, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्यायाचे खरे प्रती म्हणजे फातिमा शेख होय. पडद्यामागे असलेल्या फातिमा शेख यांची जयंती पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात खऱ्या वंचितामध्ये साजरी करून त्यांच्या विचारांना खऱ्या अर्थाने न्याय दिला आहे असे प्रतिपादन नवनिर्वाचित नगरसेवक शेख रईस यांनी जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात केले. बीड येथील जिव्हाळा बेघर निवारा केंद्र येथील निराधार,वंचित घटकांसमवेत अल्पसंख्याक समाजातील पहिल्या महिला स्त्री शिक्षिका फातिमा शेख यांची जयंती ९ जानेवारी रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई आणि दैनिक समर्थ राजयोग यांच्या संयुक्त विद्यमाने साजरी करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे आयोजक पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख तथा संपादक वैभव स्वामी यांच्यासह फौजदार राजू गुळभिले,नगरसेवक शेख रईस, निराधार,विधवा, वंचित, निरक्षर महिलांना न्याय देण्यासाठी तत्पर असलेल्या सामाजिक कार्यकर्त्या रेहाना पठाण यांच्यासह आम्रपाली साबळे, सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. ओमप्रकाश नायर, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता गोपाळ नाईक, एसटी महामंडळातील सेवानिवृत्त बाबासाहेब जाधव, महारुद्र मोराळे, लक्ष्मणराव वंजारे, राजकुमार कागदे जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य, मुख्य व्यवस्थापक राजू वंजारे, महिला काळजीवाहक छायाताई सरोदे यांच्यासह मान्यवर मंडळी उपस्थित होती. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्त्या रेहाना पठाण म्हणाल्या की, फातिमा शेख यांच्या कार्यामुळे भारतीय समाज सुधारणेच्या इतिहासात मुस्लिम महिलांचे योगदान ठळकपणे अधोरेखित झाले आहे.

# अंजुमन इशात-ए-तालीम संस्थेचे संस्थापक अहमदबीन अबुद चाऊस यांचा १५ वा स्मृतीदिन

**बीड । प्रतिनिधी**

अल्पसंख्याक समाजातील शैक्षणिक क्रांतीचे प्रणेते आणि अंजुमन इशात-ए-तालीम संस्थेचे संस्थापक स्वर्गीय अहमदबीन अबुद चाऊस यांचा १५ वा स्मृतीदिन मिलिया मुलींची प्राथमिक शाळा, भालदारपुरा, बीड येथे मोठ्या उत्साहात व आदरांजलीने साजरा करण्यात आला.

शैक्षणिक कार्याचा गौरव- स्वर्गीय अहमदबीन अबुद चाऊस साहेब यांनी बीड जिल्ह्यासह धारूर, परळी वैजनाथ आणि अंबाजोगाई यांसारख्या भागांत शाळा, ज्युनिअर कॉलेज आणि वरिष्ठ महाविद्यालयांचे जाळे विणले. अल्पसंख्याक समाजातील मुले-मुली शिक्षणापासून वंचित राहू नयेत, या उदात्त हेतूने त्यांनी या संस्थांची उभारणी केली होती. त्यांच्या या कार्यामुळेच आज हजारो विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामील झाले आहेत.



विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम- स्मृतीदिनाचे औचित्य साधून शाळेत विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते:

चित्रकला स्पर्धा: विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देण्यासाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यात विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

जिलबी वाटप: कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना जिलबीचे वाटप करून गोड तोंड करण्यात आले.

मान्यवरांची उपस्थिती- या कार्यक्रमाच्या प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती मिर्झा कानिस फातेमा आणि प्रभारी श्रीमती रिजवाना बेगम कादरी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मुख्याध्यापिकांनी अहमदबीन अबुद चाऊस साहेबांच्या जीवनावर प्रकाश टाकला आणि त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्याचे आवाहन केले.

यावेळी शाळेतील शिक्षिका आणि कर्मचारी संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# श्री नारायण विद्यालयाने इलेमेंटरी, इंटरमिजिएट परीक्षेत घवघवीत यश संपादन

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथील श्री नारायण मा. व उच्च मा. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शासकीय रेखा कला इंटरमिजिएट, इलेमेंटरी परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले.

परीक्षेचा १००% टक्के निकाल लागला. इलेमेंटरीचे ३४ आणि इंटरमिजिएट चे २३ एकूण ५७ विद्यार्थी परीक्षेत बसले होते आणि ५७ पास झालेत. शासकीय रेखाकला इंटरमिजिएट परीक्षेत एकूण २३ विद्यार्थी बसले होते त्यापैकी ए श्रेणीमध्ये रकटे रिद्धी, गायकवाड सांची, रकटे उत्कर्षा, रकटे सार्थक.

बी श्रेणीमध्ये सात विद्यार्थी आणि सी श्रेणीमध्ये १२ विद्यार्थी पास झालेले आहेत. एकूण शाळेचा इंटरमिजिएट चा निकाल शंभर टक्के लागलेला आहे.

इलेमेंटरी चा निकाल शंभर टक्के निकाल लागला.

बी ग्रेड मध्ये एकूण १८ विद्यार्थी. सी ग्रेड मध्ये एकूण १६ विद्यार्थी ऐकून ३४ विद्यार्थी बसले होते आणि ३४ पास झालेले आहेत.

संस्थेचे अध्यक्ष मा. महादेवराव काळे आण्णा, संस्थेचे सचिव तथा प्राचार्य अमोल काळे सर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी भरपूर असे यश संपादन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव केला. या उज्वल यशामागे कला शिक्षिका सौ.राजश्री काळे / पिंगळे मॅडम यांनी त्यांना मार्गदर्शन करून सराव करून घेतला त्यामुळे हे यश संपादन करता आले. मॅडमच्या शिकवण्याच्या कलामुळे विद्यार्थ्यांना चित्र काढण्यासाठी प्रोत्साहन मिळाले.

# किशोरी इंग्लिश स्कूलच्या स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत झाला: सौ. नितिका विलास

## शिक्षणासोबत संस्कार, कला आणि सर्व विद्यार्थांना समान संधी देण्याची भूमिका किशोरी इंग्लिश स्कूल जोपासते - संचालिका डॉ. अदिती सारडा

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील प्रियदर्शनी एज्युकेशन ट्रस्ट संचलित किशोरी इंग्लिश स्कूलच्या तिसऱ्या वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणारा सांस्कृतिक उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहूण्या म्हणून उपस्थित असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथील अतिरिक्त आयकर आयुक्त सौ. नितिका विलास मॅडम यांनी विद्यार्थांचे कौतूक केले. त्या म्हणाल्या, अशा स्नेहसंमेलनातून लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, शिस्त आणि व्यक्तिमत्त्व विकास घडवणारे असे दर्जेदार कार्यक्रम विद्यार्थांसाठी महत्वाचे आहेत. किशोरी इंग्लिश स्कूलच्या सुयोग्य नियोजन, शिस्तबद्ध आयोजन आणि विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांबद्दल त्यांनी विशेष प्रशंसा व्यक्त केली. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षा आदित्य एज्युकेशन ग्रुप व प्रियदर्शनी एज्युकेशन ट्रस्टच्या संचालिका डॉ. अदिती सारडा यांनी, गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत प्रत्येक विद्यार्थ्याला समान संधी व न्याय देण्याची भूमिका किशोरी इंग्लिश स्कूल सातत्याने जपत असल्याचे स्पष्ट केले.



शहरातील नामांकित प्रियदर्शनी एज्युकेशन ट्रस्ट संचलित किशोरी इंग्लिश स्कूल शाळेचे तिसरे वार्षिक स्नेहसंमेलन अत्यंत उत्साहात आणि आनंदी वातावरणात पार पडले. शाळेच्या प्रांगणात आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळाले असून, शिस्तबद्ध नियोजन व दर्जेदार सादरीकरणामुळे उपस्थित मान्यवर व पालक प्रभावित झाले. प्लेग्रुप ते इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी बहारदार सादरीकरणातून करत स्वत:चा आत्मविश्वास वाढला

या स्नेहसंमेलनासाठी छत्रपती संभाजीनगर येथील अतिरिक्त आयकर आयुक्त सौ. नितिका विलास या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदित्य एज्युकेशन ग्रुप व प्रियदर्शनी एज्युकेशन ट्रस्टच्या संचालिका डॉ. अदिती सारडा या होत्या. यावेळी नामांकित चार्टर्ड अकाउंटंट गिरीषजी गिल्डा, प्रशासकीय अधिकारी संतोष लहाणे, राष्ट्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या डी. ओ. तायडे आणि किशोरी इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या एम. आर. बिरला यांची उपस्थिती होती.

या स्नेहसंमेलनात प्लेग्रुप ते इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी नृत्य, गीत, नाट्य तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या भारूड, छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्यगाथेवर आधारित सादरीकरण, तसेच महाभारतातील प्रसंगांच्या आधारे स्त्री अन्याय व स्त्री सक्षमीकरणाचा प्रभावी संदेश देणाऱ्या नाट्यप्रयोगाने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. लहानग्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाला पालक व मान्यवरांकडून भरभरून दाद मिळाली.

मान्यवरांनी आपल्या भाषणांतून किशोरी इंग्लिश स्कूलच्या शिक्षण पद्धतीचे व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांचे कौतुक केले. शाळेतील शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थ्यांच्या सहकार्यामुळे हे स्नेहसंमेलन यशस्वी ठरले असून, गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच संस्कार आणि कला जोपासणारी शाळा म्हणून किशोरी इंग्लिश स्कूलने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

दैनिक मराठवाडा पत्र

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • सोमवार, दि. १२ जानेवारी २०२६ • पान ४

# नगराध्यक्षाचे पदग्रहण होताच गावच्या स्वच्छतेसाठी भाभी लागल्या कामाला

• नगराध्यक्ष गीताभाभी पवार यांच्या उपस्थितीत स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत स्वच्छता मोहीम
• स्वच्छ गेवराई सुदंर गेवराईसाठी नागरिकांनी सहभाग घ्यावा : नगराध्यक्षा गिताभाभी

**गेवराई । प्रतिनिधी**

स्वच्छ गेवराई सुदंर गेवराईचे जनक आदरणीय बाळराजे दादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराईकरांनी चौथ्यांदा नगरपरिषद भाजपाच्या ताब्यात दिली आहे तरी स्वच्छतेसाठी नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन नगराध्यक्षा सौ. गिताभाभी पवार यांनी केले आहे. भारत सरकारने पाच वर्षांसाठी सुरू केलेल्या २०२१ मधील स्वच्छ भारत अभियान २.० स्वच्छता मोहीम गेवराई शहरांमध्ये नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. गीताभाभी बाळराजे पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत नगरपरिषद कडून राबवण्यात आली. शहरांमधील नवीन बसस्थानक




व कोर्ट परिसरामध्ये नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ गीताभाभी बाळराजे पवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये व सर्व सन्माननीय नगरसेवक, नगरपरिषद कार्यालयीन स्टाफ व स्वच्छता विभागातील कर्मचारी यांनी स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत स्वच्छता मोहीम दि. ९ जानेवारी रोजी राबवत भारत सरकारने सुरू केलेल्या पाच वर्षाकरिता २०२१ मधील स्वच्छ भारत अभियान २.० स्वच्छता मोहीम मध्ये गेवराई नगरपरिषद ने आपला सहभाग नोंदवला. व नवीन बस स्थानक तसेच को भारत सरकारने पाच वर्षांसाठी सुरू केलेल्या २०२१ मधील स्वच्छ भारत ▶▶ उर्वरित पान २ वर

## विशेष मकर संक्रांत सणानिमित्त जरूर चे जलदूत राजेश काकडे यांच्यावतीने माता भगिनींना किराणा किरणा किटचे वाटप



**बीड । प्रतिनिधी**

जरूर गावचे भूमिपुत्र जलदूत राजेश काकडे या अवलियाने समस्त गावातील माता भगिनींना किराणा किट वाटपचे आयोजन केले होते या कार्यक्रमात विशेष उपस्थिती पिंपळनेर पोलीस स्टेशन चे ए पी आय मधुसूदन घुगे साहेब, बीडचे सामाजिक कार्यकर्ते अशोक दादा ढोले पाटील, दिव्यांग कर्मचारी संघटना प्रदेशाध्यक्ष उपाध्यक्ष अशोक आठवले साहेब, गावातील सरपंच श्रीराम काकडे उपसरपंच पंजाब दादा काकडे ग्रामपंचायत सदस्य सुरेश काकडे पत्रकार जालिंदर काकडे शाम काकडे अमोल काकडे विलास काकडे विनोद काकडे दीपक काकडे ज्ञानेश्वर काकडे किशोर काकडे जेष्ठ नेते भाऊ सुरवसे,करणं बोरगे ,व गावातील ज्येष्ठ नागरिक, सह आदी मान्यवर उपस्थित किराणा किटचे वाटप केले, व या कार्याबद्दल पिंपळनेर ची पी आय घुगे साहेब यांनी आपले मनोगत व्यक्त करताना मनाले आजच्या युवकांनी राजेश काकडे यांचा आदर्श घेऊन वाढदिवस पुण्यतिथी आदी सणा निमित्त असेच गोरगरिबांना जे आपल्या परीने दान होईल ते आयोजन करावे विशेष कवतुक केले व सर्व मान्यवरांनी राजेश काकडे यांचे कवतुक केले

## मरणोत्तर नेत्रदान : बीड मध्ये दोन जणांना मिळाली नवीन दृष्टी

**बीड । प्रतिनिधी**

माजलगाव येथील कौशल्या सुखलाल बजाज यांनी नेत्रदानाचा केलेला संकल्प होता. केला त्यांच्या निधनानंतर केलेल्या नेत्रदानामुळे दोघांचे जीवन प्रकाशमय झाले. त्यांचा हा नेत्रदानाचा निर्णय प्रेरणादायी ठरत आहे. कौशल्या बजाज यांचे नेत्रदान करून बजाज कुटुंबाने समाजापुढे एक आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या निर्णयामुळे दोन अंध व्यक्तींना दृष्टी प्राप्त होउन त्यांच्या जीवनात नव्या प्रकाशाची किरणे उमलली आहेत. देहदान नव्हे तर नेत्रदानाच्या माध्यमातूनही एखादी महिला किती मोठे कार्य करू शकते हे कौशल्या बजाज यांनी कृतीतून दाखवून दिले. त्यांच्या या सामाजिक जाणिवेने अनेकांना नेत्रदानासाठी प्रेरणा मिळणार आहे. कौशल्या बजाज यांनी मृत्यूपुर्वीच नेत्रदानाबद्दलची ईच्छा नातेवाईकांकडे व्यक्त केली होती. त्याप्रमाणे त्यांच्या मृत्युनंतर रेणुकाई हॉस्पिटलचे संचालक नेत्रतज्ञ डॉ. स्वानंद कुलकर्णी यांच्यासोबत जिल्हा रूग्णालयाच्या कर्मचाऱ्यांनी सदर शस्त्रक्रिया पार पाडली सदरील दोन्ही डोळे जिल्हा रूग्णालयातील आय बँकेला सुपुर्द करण्यात आले . कौशल्या यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबियांच्या वतीने गोशाळेतील गायींना चाऱ्यासाठी एक लाख रूपायांची मदत केलेली आहे. त्याचबरोबर त्याचबरोबर राजस्थांनी वैकुंठधाम स्मशानभुमीतील परिसर विकासाला चालना मिळावी या करीता पन्नास हजार रूपयांची आर्थिक मदत करण्यात आलेली आहे.

## बीड जिल्ह्यात तापमान घटले ; उत्तरेकडील वाऱ्यांमुळे हुडहुडी वाढली

**बीड । प्रतिनिधी**

नव्या वर्षाच्या सुरुवातीलाच बीड जिल्ह्यात निसर्गाचा लहरीपणा पाहायला मिळत आहे. गेल्या १० दिवसांत जिल्ह्याच्या किमान तापमानात तब्बल ६ अंशांची घसरण झाली असून, पारा १२ अंशांपर्यंत खाली आला आहे.उत्तर भारतात झालेल्या बर्फवृष्टीमुळे तेथून येणाऱ्या थंड कोरड्या वाऱ्यांनी महाराष्ट्राची दिशा पकडली आहे. यामुळे मागील चार दिवसांपासून किमान तापमानात ६ अंशांनी घट झाली आहे. पुढील तीन दिवस हा बाज कायम राहणार आहे. डिसेंबर महिन्यानंतर अचानक थंडीत घट होऊन वातावरणातील उकाडा काही प्रमाणात वाढला होता. यामुळे जवळपास सहा ते सात दिवस थंडी गायब झाल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान, पुन्हा थंडीने कमबॅक केले आहे. सध्या उत्तर भारतात वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे मोठ्या प्रमाणात हिमवृष्टी झाली आहे. या नैसर्गिक प्रक्रियेमुळे उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहणाऱ्या वाऱ्यांचा वेग वाढला आहे. हे वारे अत्यंत कोरडे आणि थंड असतात. जेव्हा हे वारे सह्याद्री आणि सातपुडा पर्वत ओलांडून मराठवाड्यात प्रवेश करतात, तेव्हा जमिनीलगतचे तापमान वेगाने खाली घसरते. जानेवारी महिन्याच्या पहिल्या दोन दिवसांत तापमान सरासरी ३० १८ अंशांच्या आसपास होते. मात्र, ५ जानेवारीनंतर हवेतील आर्द्रता कमी झाली आणि आकाश निरभ्र झाल्याने जमिनीतील उष्णता वेगाने उत्सर्जित झाली.

## अखेर चिमुकल्यांच्या आक्रोशाने जिल्हा प्रशासन जागे

• सव्वा दोन महिन्यांपासून लिंबाच्या झाडाखाली शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा ‘वनवास’ संपला
• सामाजिक कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्याला यश ; प्रसारमाध्यमांचे आभार – डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील गेवराई मतदारसंघातील टाकरवण जिल्हा परिषद शाळा केंद्रांतर्गत येणाऱ्या दत्तनगर वस्तीशाळेच्या विद्यार्थ्यांना अखेर त्यांच्या हक्काची शाळा इमारत मिळाली आहे. शाळेसाठी सुसज्ज इमारत उपलब्ध असतानाही शाळेकडे जाणारा रस्ता अतिक्रमणामुळे बंद झाल्याने गेल्या सव्वा दोन महिन्यांपासून विद्यार्थ्यांना लिंबाच्या झाडाखाली, उघड्यावर शिक्षण घ्यावे लागत होते. या गंभीर प्रकरणी शालेय व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक व पालकांनी वरिष्ठ कार्यालयांकडे



वारंवार लेखी निवेदने सादर केली होती; मात्र प्रशासनाकडून कोणतीही ठोस दखल घेतली जात नव्हती. अखेर सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली सहकारी, शिक्षणप्रेमी, पालक व विद्यार्थ्यांनी दि. ०५ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर रास्ता रोको आंदोलन केले.यावेळी जिल्हाधिकारी जागे व्हा, पालकमंत्री अजित पवार जागे व्हा, आ. विजय सिंह पंडित जागे व्हा अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. यानंतर विद्यार्थ्यांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालयात ठिय्या आंदोलन केले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पालक व विद्यार्थ्यांशी संवाद साधत तहसीलदार व गटविकास अधिकाऱ्यांना तातडीने शाळेचा रस्ता खुला करण्याचे आदेश दिले. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार दि. ०९ (शुक्रवार) रोजी गटविकास अधिकारी ज्योत्स्ना मुळीक, तलाठी ▶▶ उर्वरित पान २ वर



*वडगाव गुंदा येथे चालू असलेल्या शिवपुराण कथेची रविवारी सांगता झाली या प्रसंगी जिल्हा परिषद सदस्य गणपत आप्पा डोईफोडे यांनी उपस्थित राहून कथा श्रवण करून कथेचा लाभ घेतला व कथा प्रवक्ते हरिभक्त परायण कल्याण महाराज देवडकर यांची आशीर्वाद घेतले.*

## तलवाडा येथील रमाई घरकुलाचे हप्ते पढत नसल्याने रिपाईचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन विनोद आठवले उपोषणास बसणार

**तलवाडा । प्रतिनिधी**



गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील २०२३/२४ चे घरकुलाचे हप्ते पढत नसल्याने रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने बीड जिल्हाधिका- यांना निवेदन देण्यात आले असुन रिपाईचे पदाधिकारी विनोद आठवले हे या संदर्भात उपोषणास बसणार आसल्याचे जिल्हाधिका- यांना दिलेल्या निवेदनात म्हण्टले आहे. या बाबत अधिक माहिती आशी की तलवाडा ता गेवराई जी बीड येथील रमाई आवास योजनेतील घरकुल योजनेतील मुख्य थोरात साहेब यांनी योजनेचा आर्थिक लाभापाई लाभ धारक वंचित ठेवले आसल्याचे निवेदनात म्हण्टले असुन पुढे म्हण्टले आहे की गेवराई प. स. समितीतील सीडीपी कार्यालयात कार्यरत असलेले सर्वे सर्वा थोरात साहेब यांच्या कडे २०२३/२४ पासुन आम्ही व लाभ धारक वारंवार जाऊन थोरात साहेब यांना ▶▶ उर्वरित पान २ वर

## रोटरी क्लबतर्फे कर्तृत्ववान महिलांचा आदिशक्ती पुरस्काराने सन्मान होणार


**गेवराई । प्रतिनिधी**

समाजकार्यात नेहमीच अग्रेसर राहून निःस्वार्थपणे सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या महिलांचा रोटरी क्लब ऑफ गेवराईच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीचे औचित्य साधून गेवराई तालुक्यातील पाच कर्तृत्ववान महिलांचा आदिशक्ती सन्मान पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष प्रा . राजेंद्र बरकसे यांनी दिली . याबाबत सविस्तर माहिती अशी की , रोटरी फौंडेशन व रोटरी इंटरनॅशनल ही सेवाभावी संस्था १४२ देश – विदेशात सामाजिक कार्य करीत सेवारत आहे . त्यांच्या संकल्पनेला साथ देण्याच्या उद्देशाने समाजामध्ये विविध क्षेत्रात , विविध प्रकारच्या व्यक्ती आपल्या कर्तृत्वाने कार्य करीत असतात . यामध्ये उद्योग , शिक्षण, सामाजिक , वैद्यकीय ,आध्यात्मिक, सांस्कृतिक, राजकीय अशा विविध क्षेत्रात आपल्या अतुलनीय कार्याबद्दल सेवा देणाऱ्या महिला कमी नाहीत . त्यांच्या कार्याचा उचित सन्मान व्हावा या उद्देशाने रोटरी ▶▶ उर्वरित पान २ वर

## चव्हाणवाडी तहत विठ्ठल नगर येथे अखंड हरिनाम सप्ताह व भावार्थ रामायण ऊत्साहत सुरवात व सांगता संपन्न

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील जाज्वल्य दैवत श्री त्वरीतादेवी मातेच्या पायथ्याशी वसलेल्या वामनभाऊ भगवानबाबा संस्थान, चव्हाणवाडी तहत विठ्ठलनगर येथे संत वामनभाऊ व संत भगवानबाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त श्री. ह.भ.प.महंत विठ्ठलमहाराज गहिनीनाथगडकर यांच्या शुभआशिर्वादाने व श्री.ह.भ.प.नवनाथ महाराज गिरी व विठ्ठल नगर समस्त ग्रामस्थ मंडळी यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताह व भावार्थ रामायण कथेस या दैनिक कार्यक्रमाने सुरुवात. सकाळी ४ ते ६




काकडा, ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, १०.३० ते १२.३० गाथा भजन, दुपारी २ ते ५ भावार्थ रामायण कथा, ५.३० ते ६ हरिपाठ व रात्री ८.३० ते १०.३० हरिकिर्तन व नंतर हरिजागर कार्यक्रम पार पडले.पारायण नेतृत्व व हरिपाठ नेतृत्व श्री. ह.भ.प. राधाकिसन म. शिंगणे, गायनाचार्य श्री. ह.भ.प. राधाकिसन माखले, रमेश म. पिंपळे, मच्छिंद्र म. केकान, मारोती तोळणे, श्री. ह.भ.प. रामप्रसाद पिंपळे, मृदंगाचार्य श्री.ह.भ.प. युवराज म. चौधरी, श्री. अंकुश महाराज, तर महाप्रसाद अन्नदाते : श्री. बाबा विलासराव बांगर हे होते. ह्या अखंड हरिनाम सप्ताहला पौष व.१ प्रतिपदा दि.४/०१/२०२६ रविवार रोजी श्री ह.भ.प.महंत विठ्ठलमहाराज गहिनीनाथगडकर यांच्या शुभआशिर्वाद व अमृततुल्य वाणीने ऊत्साहत सुरवात. अनुक्रमे दिं. ५/१/२०२६ रोजी ह.भ.प.महंत ▶▶ उर्वरित पान २ वर

## बुरंडवाडीत मंगळवारी ह.भ.प. श्रीराम महाराज विडेकर यांचे कीर्तन

### कै.पंडित भोसले यांच्या प्रथम पुण्यस्मरणाचे औचित्य

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील बुरंडवाडी (विडा) येथील डॉ. विश्वनाथराव कराड माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील आदर्श शिक्षक कै.पंडित बळीराम भोसले यांच्या प्रथम पुण्यस्मरणा निमित्त आयोजित श्रीमद् भागवत कथेची सांगता मंगळवारी (१३ जानेवारी) रोजी ह.भ.प महंत श्रीराम महाराज विडेकर यांच्या सुश्राव्य कीर्तनाने होणार आहे.

गेल्या वर्षभरापूर्वी कै. पंडित भोसले यांचे दुःखद निधन झाले होते.त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ बुरंडवाडी येथे गेली सात दिवसांपासून अध्यात्मिक



सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असुन ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज शास्त्री यांच्या रसाळ वाणीतून 'श्रीमद् भागवत कथा' ज्ञानयज्ञाचे आयोजन करण्यात आले होते.या कथेचा लाभ घेण्यासाठी पंचक्रोशीतील भाविकांनी मोठी गर्दी केली होती.या धार्मिक महोत्सवाची सांगता मंगळवारी दुपारी १० ते १२ या वेळेत ह.भ.प.महंत श्रीराम महाराज विडेकर (साधू शिवरामपुरी मठ संस्थान ▶▶ उर्वरित पान २ वर

## कर्तव्यदक्ष तहसिलदार वैशाली पाटील यांच्या पुढाकाराने अडगळीस पडलेल्या रस्त्यचा प्रश्न मार्गी

### मातावळी येथील ग्रामस्थांकडून प्रशासनाचे आभार

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे मातावळी येथील वामनभाऊ नगर ते तुळजाभवानी माता मंदिर वस्ती या रस्त्यावर ठिकठिकाणी अतिक्रमण झाल्याने रस्त्या रहदारीस बंद असल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. आष्टी तहसीलच्या कर्तव्यदक्ष



तहसीलदार वैशाली पाटील यांनी ग्रामस्थांची अडचण लक्षात घेऊन पुढाकार घेतला अन् पिढ्यान पिढचा रस्त्याचा प्रश्न मार्गी लावला.दिड किलोमीटर लांबीचा रस्ता अधिकृतरित्या खुला



करण्यात आला. तहसीलदार पाटील यांच्या पुढाकाराने हि कारवाई करण्यात आल्याने ग्रामस्थांनी आभार मानले आहेत. तालुक्यातील मातावळी येथील वामनभाऊ नगर ते तुळजाभवानी माता मंदिर या वस्तीवर ३० हून अधिक कुटुंब या भागात वास्तव्यास आहेत. येथील शेतकरी बांधव दुग्ध व्यवसाय मोठ्या प्रमाणावर करतात त्यांना रस्त्या अभावी नाहक त्रासाला सामोरे जावे लागत होते.पावसाळ्यात चिखल, अरुंद व अडथळे मार्ग यामुळे शेतीमालाची वाहतूक, शाळकरी मुले तसेच आजारी व वृद्धाचे ये जा याच रस्त्याने होत असे. सदरिल ठिकाणच्या रहिवाशांची मागणी लक्षात घेता तहसील प्रशासनाने पुढाकार घेत भूमी अभिलेख कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत प्रत्यक्ष शिवारात जाऊन रस्त्याची स्थान निश्चिती केली आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून पाणंद रस्ता मोकळा करून दिला.हा रस्ता खुला झाल्यामुळे परिसरातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना शेतीमाल बाजारपेठेत नेणे अधिक सोपे होणार आहे. वाहतुकीचा वेळ व खर्च कमी होणार आहे . रस्ता उपलब्ध झाल्याने पालकांनीही समाधान व्यक्त केले आहे. अबाल-वृद्ध नागरिकांसाठी दवाखाना, बाजारपेठ व गावाशी संपर्क सुलभ झाला . प्रशासनाने तत्परतेने कार्यवाही केल्याबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त करत तहसीलदार वैशाली पाटील मॅडम, भूमी अभिलेख अधिक्षक चिंतामणी मोरे,मंडळ अधिकारी आर.एन.आचार्य व संबंधित कर्मचाऱ्यांचे आभार मानले आहेत.